अति महत्वाचे

दुरध्वनी कं : 022 22618987
022 22708738
Email:- supt.statunit@gmail.com

सांख्यिकी कक्ष
फोर्ट, मुंबई– ४०० ०३२.

## UDSTAT/ICD/2015-16/273 of 2016

परिपत्रक:–

**विषय:–** १. अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम (AISHE) संदर्भ वर्ष २०१२–१३ ते २०१५–१६

२. व्यवस्थापकीय माहिती पध्द्त (MIS) संदर्भ वर्ष २०१३–१४ ते २०१५–१६.

३. Students On Roll वर्ष २०१४–१५ व २०१५–१६ संकेतस्थळावर ऑनलाईन माहिती नोदंणीबाबत.

**संदर्भ** :–क्र.उशिसं/सांख्यिकी/एमआयएसएचई/२०१४–१५/९९००, दिनांक–२७/११/२०१४.

महोदय,

उपरोक्त विषय व संदर्भास अनुसरून प्राचार्य/संचालक आणि सर्व संलग्नित महाविद्यालये व संस्था यांचे लक्ष वेधु इच्छितो की, राज्यातील उच्च शिक्षणाबाबतचे धोरणात्मक निणर्य घेण्यासाठी शैक्षणिक वर्ष (संदर्भ वर्ष) २०१२ ते २०१६ (AISHE) बाबत आणि शैक्षणिक वर्ष (संदर्भ वर्ष) २०१३–१४ ते २०१५–१६ (MIS) बाबतची सांख्यिकी माहिती भरणे अत्यंत आवश्यक आहे, त्या अनुषंगाने मुंबई विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या सर्व महाविद्यालये, विद्यापीठ विभाग व संस्थांकडून अनुक्रमे ऑनलाईन पद्धतीने विवरण पत्रांमध्ये माहिती मागविण्यात येत आहे.

मानव संसाधन विकास(AISHE), मंत्रालय, नवी दिल्ली आणि व्यवस्थापकीय माहिती पदधत (MIS), उच्च शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण विभाग, पुणे, यांनी दिलेल्या आदेशानुसार सदरची माहिती(AISHE) करिता www.aishe.gov.in या वेबपोर्टलवर व (MIS) करिता www.dhemis.maharashtra.gov.in व विद्यार्थी संख्येची माहिती Students on Roll www.eoffice.mu.ac.in या वेबपोर्टलवर उपलब्ध असलेल्या विवरण पत्रामध्ये ऑनलाईन भरावयाची आहे.

उपरोक्त सूचनेप्रमाणे सर्वेक्षणाद्वारे शासनाला उपलब्ध होत असलेली विविध शैक्षणिक बाबींची महत्वाची माहिती लक्षात घेता महाविद्यालये यांनी ती नोंदविणे अत्यंत आवश्यक आहे. या सदंर्भात वेबपोर्टलवर माहिती भरण्याकरिता सलंग्नित महाविद्यालयातील व विद्यापीठ विभागातील अधिकारी व कर्मचारी यांना कळविण्यात येते की, **प्रत्येक वर्षाकरिता महाविद्यालयांनी वेबपोर्टलवर माहिती भरून प्राचार्य यांचे यांबाबतचे सोबत जोडलेले प्रमाणपत्र विद्यापीठास सादर केल्याशिवाय महाविद्यालयांचे भविष्यात विद्यापीठाकडे येणारे परिक्षा अर्ज (Examination Form) व नोंदणी अर्ज (Enrollment Form) परिक्षा अर्ज/नोंदणी अर्ज/महाविद्यालयाची संलग्नता (Continuation/Extention)/प्राचार्य/शिक्षक मान्यता (Approval) स्वीकारण्यात येणार नाहीत, तसेच जाहिरात–मसुदा व बिंदूनामावली तपासली जाणार नाही. व अशा महाविद्यालय/विभाग/संस्था यांची नावे blacklist (काळया यादीत) दाखविण्यात येऊन विद्यापीठ website वर highlight करून दर्शविण्यात यावेत व कायदेशीर कारवाई करण्यात यावी, असा आदेश संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांनी दिलेला आहे याची नोंद घ्यावी.**

कृ.मा.प

वरील सर्व बाबींचा विचार करता आपणांस संबंधित माहिती विहित विवरण पत्रामध्ये भरताना काही अडचणी उद्भवल्यास खालील ठिकाणी संपर्क साधावा:—

तत्संबंधीतील माहिती ऑनलाईन पदधतीने विहित विवरण—पत्रांमध्ये तात्काळ Online भरून पाठवावी, जेणे करून महाराष्ट्र शासन व संचालनालय व विद्यापीठ यांना माहिती मिळणे सोयीस्कर होईल. याकरिता सर्व संबंधित महाविद्यालये/संस्था यांनी सदरची माहिती तात्काळ upload करावी. व सोबत असलेले हमीपत्र/प्रमाणपत्र भरून सांख्यिकी कक्षाकडुन ना—हरकत प्रमाणपत्र घ्यावे.

| Contact Person | Office | Land Line No. | Email |
|---|---|---|---|
| Nodal Officer (AISHE / MIS) | University of Mumbai, Statistical Unit, Room No-202, Fort, Mumbai- 32 | 022-22708738<br>022-22618987 | supt.statunit@gmail.com |
| AISHE / MIS Call Centre Pune | Director of Higher Education, Pune. | 020-65001016<br>020-65001173 | stat.dhepune@nic.in<br>dilipkadam7149@gmail.com |

**टिप्पणी :— MIS बाबतची माहिती फक्त कला, वाणिज्य, विज्ञान, शिक्षणशास्त्र व विधी महाविद्यालय यांनी भरणे आवश्यक आहे. (Except Architecture, Engineering Management and Pharmacy colleges.)**

मुंबई — ४०००३२.
दिनांक :— १९/०१/२०१६.

(डॉ. एम. ए. खान)
कुलसचिव

---

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाही करीता रवाना :—

१. संचालक, शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, मध्यवर्ती इमारत पुणे— ४११ ००१.
२. परीक्षा नियंत्रक, परीक्षा विभाग, मुबंई विद्यापीठ, विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व),मुंबई—४०० ०९८.
३. उपकुलसचिव, संलग्नता विभाग, मुबंई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई— ४०० ०३२.
४. उपकुलसचिव, घटक महाविद्यालये, मुबंई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई— ४०० ०३२.
५. उपकुलसचिव, पदवुत्तर विभाग, मुबंई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई— ४०० ०३२.
६. उपकुलसचिव, विशेष कक्ष, मुबंई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई— ४०० ०३२.
७. उपकुलसचिव, नाव नोंदणी विभाग, मुबंई विद्यापीठ, विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई—४०० ०९८.
८. अधिक्षक, आवक विभाग, मुबंई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई— ४०००३२.
९. अधिक्षक, आवक विभाग, मुबंई विद्यापीठ, विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व),मुंबई—४०० ०९८.

यांना असे कळविण्यात येते की, AISHE, MIS व Student On Roll बाबतची माहिती विद्यापीठ विभाग व संलग्न महाविद्यालये व मान्यता प्राप्त संस्था यांनी भरणे अनिर्वाय असून सदर माहिती न भरल्यास त्या विभागाचे/महाविद्यालय/संस्थेच्या विद्यार्थ्याचे **परिक्षा अर्ज (Exam.Form) व नोंदणी अर्ज (Enrollment Form) महाविद्यालयाची संलग्नता (Continuation/Extension)/प्राचार्य/शिक्षक मान्यता (Approval) व महाविदयालये/संस्थांचे कोणतेही पत्रव्यवहार स्विकारू नयेत तसेच जाहिरात, मसुदा, बिदुंनामावली तपासणी करू नये असा आदेश मा. संचालक, संचालनालय, उच्च शिक्षण विभाग, पुणे,व मा. कुलगुरू, मुबंई विद्यापीठ यांनी दिलेला असून त्याप्रमाणे प्रत्येक विद्यापीठ विभाग/संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्थेकडून त्याबाबतचे प्रमाणपत्र संबंधितांकडून घेण्यात यावे.**

(डॉ. एम. ए. खान)
कुलसचिव

# प्रमाणपत्र / हमीपत्र

दिनांक :—

असे प्रमाणित करण्यात येते की, आपण दिलेल्या प्र—पत्राच्या विहित नमुन्याप्रमाणे संकलित केलेली माहिती खालीलप्रमाणे :—

| अनु. क्र. | विषय व संकेतस्थळ | परिपत्रक क्रमांक | माहिती भरली आहे / नाही |
|---|---|---|---|
| १. | विद्यार्थी संख्या माहिती २०१५—१६ (Student on Roll) www.eoffice.mu.ac.in/statistical | No.UDSTAT/ICD/2015-16 /185 of 2015 Dt.8th October, 2015 | |
| २. | अखिल भारतीय उच्च शिक्षण संस्था (AISHE) २०१४—१५ व २०१५—१६ www.aishe.gov.in | No.Stat/DCF/(121)/146, dt.28 October, 2014 | |
| ३. | व्यवस्थापकीय माहिती पद्धत २०१५—१६ (MIS) dhemis.maharashtra.gov.in | सांख्यिकी / MIS/122/200/2015 dt.21 October, 2015 | |

उपरोक्त पोर्टलवर भरलेली माहिती परीपूर्ण व अचूक आहे. संबंधित माहितीमध्ये काही त्रुटी आढळल्यास महाविद्यालयाचा/ संस्थेचा प्राचार्य/प्रमुख या नात्याने मी सर्वस्वी जबाबदार राहीन, याची मी ग्वाही देतो.

दिनांक:—

Contact No:- ________________

Email Id:- ________________________________

संचालक / विभाग प्रमुख / प्राचार्य

(नाव,सही व शिक्का)

---

## कार्यालयीन कामकाजाकरिता

---

————————————————————महाविद्यालयाची AISHE/ MIS/ STUDENT ON ROLL 2015-16 माहिती सांख्यिकी कक्षाकडे प्राप्त झालेली असून त्यांचा **परिक्षा अर्ज / नोंदणी अर्ज महाविद्यालयाची संलग्नता (Continuation/Extention)/ प्राचार्य / शिक्षक मान्यता (Approval)** स्विकारण्यास तसेच **जाहिरातमुसदा व बिंदूनामावली** तपासण्यास हरकत नाही.

नोडल अधिकारी
AISHE/MIS
मुंबई विद्यापीठ
सांख्यिकी कक्ष,रूम न.२०२,
फोर्ट, मुंबई—४०० ०३२.

दिनांक :—

# शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण),

## महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे४११००१

फोन क्र - ०२० २६१२२२२९/२६०५२५१२/२६१३०६२७ | फॅक्स क्रमांक - ०२०/२६१११९५३

Web - www.dhepune.gov.in | E-mail - dhepune@yahoo.co.in


क्र.उशसं/सांख्यिकी/एआयएसएचई/२०१४-१५/ 9900 | दिनांक - २४.११.२०१४ 27 NOV 2014

प्रति,

कुलसचिव,

१. डेक्कन कॉलेज, येरवडा पुणे
२. इन्सिटीटयूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी मुंबई
३. टाटा इन्सिटीटयूट ऑफ सोशल सायन्स, मुंबई
४. मुंबई विदयापीठ, मुंबई
५. शिवाजी विदयापीठ, कोल्हापूर
६. स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विदयापीठ, नांदेड
७. भारती विदयापीठ, धनकवडी, पुणे
८. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विदयापीठ, औरंगाबाद
९. कवी कुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविदयालय, रामटेक जि.नागपूर
१०. कृष्णा इन्सिटयूट ऑफ मेडिकल सायन्सेस, अभिमत विदयापीठ, कऱ्हाड
११. महाराष्ट्र पशु व मत्स्य संवर्धन विदयापीठ, नागपूर
१२. आरोग्य विदयापीठ, नाशिक
१३. मराठवाडा कृषी विदयापीठ, परभणी
१४. उत्तर महाराष्ट्र विदयापीठ, जळगांव
१५. प्रवरा इन्स्टियूट ऑफ मेडिकल सायन्सेस, अहमदनगर
१६. पुणे विदयापीठ, पुणे
१७. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विदयापीठ, नागपूर
१८. संत गाडगेबाबा अमरावती विदयापीठ, अमरावती
१९. श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विदयापीठ, मुंबई
२०. सोलापूर विदयापीठ, सोलापूर
२१. सिंबायोसिस आंतरराष्ट्रीय विदयापीठ, सेनापती बापट मार्ग, पुणे
२२. डी.वाय.पाटील शैक्षणिक संस्था, कोल्हापूर
२३. एम.जी.एम.इन्सिटीटयूट ऑफ हेल्थ सायन्सेस, नवी मुंबई
२४. दत्ता मेघे इन्सिटीटयूट ऑफ मेडिकल सायन्सेस, नागपूर
२५. डॉ.डी.वाय.पाटील विदयापीठ, पिंपरी पुणे
२६. होमी भाभा नॅशनल इन्सिटीटयूट, मुंबई
२७. महात्मा फुले कृषी विदयापीठ, राहूरी जि.अहमदनगर
२८. नर्सी मोनजे इन्सिटीटयूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, मुंबई
२९. पदमश्री डॉ. डी.वाय पाटील विदयापीठ, मुंबई
३०. टाटा इन्सिटीटयूट ऑफ फंडामेंटल रिसर्च, मुंबई
३१. सेंट्रल इन्सिटीटयूट ऑफ फिशरीज एज्युकेशन, फिशरीज एज्युकेशन, मुंबई
३२. डीफेन्स इन्सिटीटयूट ऑफ अॅडव्हान्स टेक्नॉलॉजी, गिरीनगर, पुणे
३३. डॉ.बाबासाहेब आंबेडकर टेक्नॉलॉजीकल युनिव्हसिटी, लोणेरे जि.रायगड
३४. गोखले इन्सिटीटयूट ऑफ पॉलिटिक्स अॅन्ड इकोनॉमिक्स, पुणे
३५. इंडियन इन्सिटीटयूट ऑफ सायन्स एज्युकेशन अॅन्ड रिसर्च, पुणे
३६. इंडियन इन्सिटीटयूट ऑफ टेक्नॉलॉजी, मुंबई
३७. इंदिरा गांधी इन्सिटीटयूट ऑफ डेव्हलपमेंट रिसर्च, मुंबई
३८. इंटरनॅशनल इन्सिटीटयूट फॉर पॉप्युलेशन सायन्स, मुंबई
४९. महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविदयालय, वर्धा
४०. टिळक महाराष्ट्र विदयापीठ, गुलटेकडी, पुणे
४१. विश्वेश्वरैय्या नॅशनल इन्सिटीटयूट ऑफ टेक्नॉलॉजी, नागपूर
४२. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विदयापीठ, नाशिक
४३. डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विदयापीठ, दापोली जि.रत्नागिरी
४४. डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विदयापीठ, अकोला
४५. गोंडवाना विदयापीठ, गडचिरोली
४६. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महापालिका मार्ग, मुंबई
४७. महाराष्ट्र नर्सिंग कॉन्सिल, मुलुंड, मुंबई
४८. महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद, सदाशिव पेठ, कुमठेकर रस्ता, पुणे

**विषय - अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम (एआयएसएचई)**
**संदर्भ वर्ष २०१२-१३, २०१३-१४ व २०१४-१५ आणि**
**व्यवस्थापकीय माहिती पध्दत (एमआयएस)**
**संदर्भ वर्ष सन २०१४-१५ संकेतस्थळावर ऑनलाईन माहिती नोंदणीबाबत**

**मानव संसाधन विकास मंत्रालय, नवी दिल्ली, भारत सरकार** यांचे मार्फत **अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम (एआयएसएचई)** राबविण्यात येतो. महाराष्ट राज्यातील सर्वेक्षणाच्या संनियंत्रणाकरीता संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांची राज्यस्तरावरील नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. सदरील सर्वेक्षणात ऑनलाईन पध्दतीने संकलित करण्यात आलेली माहिती शासनाला शिक्षण क्षेत्रातील महत्वाचे, मूलभूत तसेच दूरगामी निर्णय घेण्याच्या हेतूने त्वरित व थेट उपलब्ध होत असल्याने ती अत्यंत आवश्यक व उपयुक्त आहे. सदरील सर्वेक्षणाकरीता वरील मंत्रालयाकडुन सन २०१४-१५ करीता सर्व विदयापीठांना सर्वेक्षणाच्या कामात समन्वय राखणे, कार्यशाळा घेणे आणि प्रवास भत्याकरीता निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. तसेच विदयापीठे आणि महाविदयालयातर्फे प्रत्येक वर्षाकरीता त्यांची माहिती भरुन ती वेबपोर्टलवर अपलोड केल्यानंतर आणि त्या माहितीला मंजुरी मिळाल्यानंतर **माहिती भरुन अपलोड करणा-या व्यक्तीस** संस्थेत चालविल्याजाणा-या अभ्यासक्रमाच्या संखेनुसार (रु एक ते दहा हजार) मानधन देण्यात येते.

२. उपरोक्त मंत्रालयाव्दारे सदरील सर्वेक्षणात www.aishe.gov.in हया वेबपोर्टलवर सर्व मान्यताप्राप्त शासकीय विदयापीठे आणि त्यासमकक्ष संस्था, विदयापीठाशी संलग्नित महाविदयालये आणि पदविका व पदव्युत्तर पदविका तसेच नऊ महिन्यापेक्षा जास्त कालावधीचे अभ्यासक्रम प्रदान करणा-या शैक्षणिक संस्थांची नोंद करण्यात येते. सदरील वेबपोर्टलवर सर्व प्रकारच्या अभ्यासक्रमाची विदयापीठे आणि शासकीय, अनुदानित, अंशतः अनुदानित आणि विनाअनुदानित संलग्नित महाविदयालये यांची शैक्षणिक संस्थेतील उपलब्ध सोई-सुविधा, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विविध अभ्यासक्रम, पटावरील व उत्तीर्ण विदयार्थी, यांची प्रत्येक वर्षाची माहिती ऑनलाईन पध्दतीने वेबपोर्टलवर नोंदविण्यात येते. विदयापीठातील माहिती नोंदणीसाठी डिसीएफ-I, महाविदयालयातील माहिती नोंदणीसाठी डिसीएफ-II ही प्रपत्रे वापरण्यात येतात. माहिती नोंदणीबाबतच्या सविस्तर व मुददेनिहाय सूचना वरील वेबपोर्टलवर उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.

३. **प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई** यांनी दिलेल्या आदेशानुसार उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील १८ मान्यताप्राप्त विदयापीठे आणि संलग्नित महाविदयालयातील विविध शैक्षणिक बाबींची माहिती ऑनलाईन नोंदविण्यासाठी **व्यवस्थापकीय माहिती पध्दत (एमआयएस)** वापरण्यात येते. याकरीता संचालनालयाकडुन www.dhemis.maharashtra.gov.in हया वेबपोर्टलची निर्मिती करण्यात आली आहे. त्यानुसार सन २०१४-१५ च्या माहिती नोंदणीचे काम दि.१.११.२०१४ पासून चालू झाले आहे. उपरोक्त दोन्ही माहिती नोंदणीच्या वेबपोर्टलचे संनियंत्रण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांचेमार्फत करण्यात येते.

..२..

२०.११.२०१४ पर्यंत **माहिती नोंदणी केली नसलेल्या विदयापीठ व संलग्नित महाविदयालांची** एकूण संख्या वर्षनिहाय नमूद केली आहे. त्यानुसार आपल्या विदयापीठाची आणि संलग्नित महाविदयालयांची सदयस्थिती लक्षात घ्यावी. सदरील शैक्षणिक संस्थांनी वरील संदर्भ वर्षाची माहिती वेबपोर्टलवर नोंदविलेली नाही.

५. सर्वेक्षणाव्दारे शासनाला उपलब्ध होत असलेली विविध शैक्षणिक बाबींची महत्वाची माहिती लक्षात घेता सर्व विदयापीठ आणि महाविदयालांनी ती नोंदविणे अत्यंत आवश्यक आहे. सबब यासंदर्भात वेबपोर्टलवर माहिती भरण्याकरीता आपल्या स्तरावरुन आपल्या विदयापीठातील आणि संलग्नित महाविदयालयातील अधिकारी व कर्मचा-यांना कळविण्यात यावे तसेच योग्य त्या सूचना देण्यात याव्यात. तसेच प्रत्येक वर्षाकरीता महाविदयालयांनी वेबपोर्टलवर माहिती भरुन प्राचार्यांचे याबाबतचे प्रमाणपत्र विदयापीठास सादर केल्या शिवाय महाविदयांलयांचे भविष्यात विदयापीठाकडे येणारे परीक्षा अर्ज स्विकारण्यात येऊ नयेत. याबाबत वरील प्रमाणे कार्यवाही केल्यास वेबपोर्टलवर माहिती नोंदणीचे काम व्यवस्थित तसेच विहित कालमर्यादेत पूर्ण करुन घेणे संचालनालयास सुकर होणार आहे. आपल्याकडुन यासंदर्भात त्वरित आवश्यक त्या वरील कार्यवाहीची अपेक्षा आहे.

2-7/11/2015

**(डॉ.प्र.रा.गायकवाड)**
प्र शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य

सोबत - वरील प्रमाणे